मुळा एज्युकेशन सोसायटीचे,

कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर.

सावित्रीबाई फुले पुणेविद्यापीठाच्या एम. कॉम पदवी करीता

सादर करावयाचा

प्रकल्प अहवाल

शैक्षजिक वर्ष-२०२१-२०२२

# प्रकल्पा चे नाव

# **भारतीय अर्थव्यवस्थेविषयी अभ्यास**

संशोधन विद्यार्थी

**कु. दहितुले किरण भाऊसाहेब**

एम . कॉम ll

मार्गदर्शक

डॉ. प्रा. श्री दरंदले एस.आर. सर
वाणिज्य विभाग

## ऋणनिर्देशक

पुणे ववद्यापीठाच्या पदवीका अभ्यास अंतर्गत ज्या वेगवेगळ्या विषयांचा समावेश होतो. विद्यार्थ्यांच्या संशोधन पद्धती माहीती व्हावी म्हणुन निरनिराळ्या विषयांवर पाहणी करून प्रकल्प अहवाल सादर करण्याचे काम विद्यार्थ्यायकडून पदविका परीक्षा भाग २ मध्ये घेतले . ही संशोधन करण्याची किवा अहवाल सादर करण्याची संधी माला पुणे ववद्यापीठाने उपलब्ध करून दिलेली आहे.

या संशोधनासाठी मला जी काही आवश्यक असणारी पुस्तके , मासिके ग्रंथालयामधील सेवकांनी उपलब्ध करून दिली त्यांच मी ऋणी आहे. मला संशोधनासाठी मार्गदर्शक म्हणुन लाभले डॉ. प्रा. श्री.दरंदले एस. आर. यांचा मी ऋणी आहे . त्यांनी केलेल्या वेळोवेळी मार्गदर्शनामुळे मी हा प्रकल्प पूर्ण करू शकलो . इतर माहिती पूर्वणारे माझे मित्र व प्रकल्प टाईप व डिझाईन करण्यासाठी मदत करणारा चि.अमित पठाण आणि विशाल जाधव यांचा मी ऋणी आहे .

Dahitule

**दहितुले किरण भाऊसाहेब**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

सोनई, ता.नेवासा वज.अहमदनगर

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **कु. दहितुले किरण भाऊसाहेब** एम. कॉम भाग २ याने २०२0-२1 सेमिस्टर चार मधील पेपर क्रमांक ४ प्रोजेक्ट वर्क या विषयांतर्गत **भारतीय अर्थव्यवस्थेविषयी अभ्यास** हा प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे .

**दिनांक** : 12 / 07/**2021**

**स्थळ : सोनई**

| | | |
|---|---|---|
| सही | सही | सही |
| मार्गदर्शक। | विभागप्रमुख | समन्वयक |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नाव | पान नं. | शेरा |
|---|---|---|---|
| १). | प्रस्तावना | | |
| २). | भारतीय अर्थव्यवस्था | | |
| ३). | भारतीय अर्थव्यवस्थेचा इतिहास | | |
| ४). | आर्थिक क्षेत्रे | | |
| 5). | अर्थव्यवस्थेमधील सरकारची भूमिका | | |
| 6). | आर्थिक विकासासाठी पंचवार्षिक योजना | | |
| 7) | पंचवार्षिक योजनेची परिणाम | | |
| 8). | वित्त संस्था | | |
| 9). | लॉकडाऊन चा अर्थव्यवस्थेवरील परिणाम | | |
| 10.) | भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये | | |

# प्रस्तावना

भारत हे वेगाने विकासाकडे वाटचाल करणारे राष्ट्र आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारतीय अर्थव्यवस्था ही एक अर्थ विकसित म्हणजे मागास अर्थव्यवस्था होती. या काळात देशाच्या पंडित नेहरू सरकार द्रष्ट नेता लाभला. त्यांनी समर्थ वैभव संपन्न भारताचे स्वप्न पाहिले आणि त्यादृष्टीने शासनाची धोरणे आखण्यात आली. जलद गतीने आर्थिक विकासाकडे आगेकूच करण्यासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आली. त्याच्याच जोडीला हरितक्रांती ,श्वेतक्रांती ,दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम ,अंतराळ संशोधन योजना ,अनुशक्ती विकास कार्यक्रम असे रचनात्मक कार्यक्रम आखण्यात आली. देशाला ,शेती उद्योग ,संरक्षण अशा सर्वच क्षेत्रात आत्मनिर्भर करण्याचे प्रयत्न करण्यात आले. शासनाच्या सर्व योजना संपूर्णपणे यशस्वी झाले असे नाही, अनेक बाबतीत अपयश आले. तरीही अनेक अडथळ्यांवर मात करून भारताची विकासाकडे संथगतीने परंतु दमदार वाटचाल चालूच राहिली आहे

या प्रकल्पांमध्ये आपण भारतीय अर्थव्यवस्थेचा इतिहास आर्थिक क्षेत्रे अर्थव्यवस्थेमधील सरकारची भूमिका भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी राबविण्यात आलेल्या पंचवार्षिक योजना झालेला परिणाम तसेच भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये अशा प्रकारच्या अनेक मुद्द्यांचा अभ्यास केला आहे

# भारतीय अर्थव्यवस्था

भारताची अर्थव्यवस्था ही अमेरिकन डॉलरच्या विनिमयाच्या दरात मोजल्यास जगातील १२ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. भारताचे वार्षिक सकल उत्पन्न (Gross domestic product) १,०८९ अब्ज डॉलर एवढे आहे (२००७).क्रयशक्तीच्या समानतेचा (Purchasing power parity अथवा संक्षिप्तरूपात PPP) निष्कर्ष लावला तर भारताच्या अर्थव्यवस्थेचा जगात तिसरा क्रमांक लागतो.

जगातील सर्वात वेगात वाढणाऱ्या प्रमूख अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा चीनपाठोपाठ दुसरा क्रमांक आहे. भारताचा आर्थिक विकासदर २००६-०७ ह्या आर्थिक वर्षात ९.४% एवढा होता. परंतु, अतिशय मोठ्या लोकसंख्येमुळे भारताचे वार्षिक दरडोई उत्पन्न मात्र ९६१ डॉलर एवढेच आहे, तर PPP वर आधारित वार्षिक दरडोई उत्पन्न ४,१८२ डॉलर एवढे आहे. जागतिक बँक भारताची "अल्प-आय असणारी अर्थव्यवस्था" अशी गटवारी करते.

## अर्थव्यवस्था - भारत

चलन : १ रुपया (INR) (भारतीय रूपया) = १०० पैसे

आर्थिक वर्ष :एप्रिल १–मार्च ३१

व्यापार संस्था :जागतिक व्यापार संघटना, दक्षिण आशियाई मुक्त

व्यापार करार

**व्यापार**

निर्यात :१२५ अब्ज डॉलर (आर्थिक वर्ष २००६-०७)

निर्यात होणारा माल : कापड, दागिने, अभियात्रिकी सामग्री, रसायने, चामडे

प्रमुख निर्यात भागीदार: अमेरिका १८%, चीन ८.९%, संयुक्त अरब अमीराती ८.४%, युनायटेड किंग्डम ४.७%, हाँग काँग ४.२% (२००५)

आयात: : १८७.९ अब्ज डॉलर (२००६ चे अनुमान)

आयात होणारा माल : कच्चे तेल,यंत्रसामग्री, मौल्यवान खडे, खत, रसायने

प्रमुख आयात भागीदार : चीन ७.२%, अमेरिका ६.४%, बेल्जियम ५.१%, सिंगापूर ४.७%, ऑस्ट्रेलिया ४.२%, जर्मनी ४.२%, युनायटेड किंग्डम ४.१% (2005).

भारताच्या अर्थव्यवस्थेत खूपच वैविध्य दिसून येते. शेती, हस्तव्यवसाय, कापडगिरण्या, उद्योगधंदे, उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक गोष्टींचा समावेश त्यात होतो. भारतात काम करणाऱ्या लोकांपैकी दोन-तृतियांश लोकांचा उदरनिर्वाह अजूनही शेती अथवा शेतीशी संबंधित उद्योगांवर चालतो, परंतु अर्थव्यवस्थेत विविध प्रकारच्या सेवांचाही वाढता वाटा आहे आणि अलिकडे सेवांवर आधारित व्यवसायही अर्थव्यवस्थेत अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. अलिकडील काही वर्षात भारतातील संगणक तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे तसेच उच्चशिक्षित आणि इंग्रजी बोलू शकणाऱ्या वाढत्या तरूण पिढीमुळे भारत हळूहळू सर्व जगाला बाह्यस्रोताच्या (outsourcing) सेवा पुरवणारा देश म्हणून भूमिका बजावायला लागला आहे. भारत हा अति-कुशल तंत्रज्ञ पुरवणारा जगातील सर्वात मोठा निर्यातक आहे. याचबरोबर उत्पादन, औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, अतिसूक्ष्मतंत्रज्ञान, दूरसंचार, जहाजनिर्माण, विमाननिर्माण, आणि पर्यटन ह्या क्षेत्रांमधील भारताची क्षमताही वेगाने वाढताना दिसत आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या बऱ्याचशा काळात भारतामध्ये समाजवादी अर्थव्यवस्थेचा मार्ग अवलंबण्यात आला. भारतात सुरुवातीस खाजगी क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेतील सहभागावर, परदेशांशी व्यापारावर, आणि इतर देशांकडून भारतात होणाऱ्या थेट गुंतवणुकीवर कडक बंधने होती. मात्र, १९९० च्या दशकाच्या सुरुवातीपासून भारताने हळूहळू परकीय गुंतवणुकीवरील आणि व्यापारावरील नियंत्रण कमी करून, आपली अर्थव्यवस्था आर्थिक सुधारांद्वारे खुली करायला सुरुवात केली आहे. मात्र, राजकारणातील मतभेद आणि भिन्न विचारधारांमुळे, सरकारी उद्योगांचे

खाजगीकरण आणि विशिष्ट क्षेत्रांमधील खाजगी आणि परकीय सहभागाला मार्ग खुला करणे अशा आर्थिक सुधारांमधील काही महत्त्वाच्या गोष्टी मंद गतीने पुढे सरकत आहेत.

अतिशय वेगात वाढणारी लोकसंख्या आणि वाढती आर्थिक आणि सामाजिक विषमता हे भारतापुढील महत्त्वाचे प्रश्न आहेत. गरीबी हाही गंभीर प्रश्न आहे, मात्र स्वातंत्रप्राप्तीनंतर गरीबीचे प्रमाण बरेच घटत असल्याचे दिसते. अधिकृत चाचणीनुसार २००४-०५ मध्ये भारतातील २७% लोक दारिद्र्यरेषेच्या खाली . दारिद्र्य कमी करण्यासाठी त्यांच्या अडचणी दूर करण्याची गरज आहे.

# भारतीय अर्थव्यवस्थेचा इतिहास

भारताचा आर्थिक इतिहास तीन कालखंडांमध्ये विभागता येतो. १७व्या शतकापर्यंतचा ब्रिटिशांच्या राजवटीआधीचा कालखंड, ब्रिटिशांच्या राजवटीचा कालखंड आणि स्वातंत्र्योत्तर कालखंड. १९९१ नंतर भारताच्या सुरुवातीच्या आर्थिक धोरणांमध्ये महत्त्वाचे बदल केले गेले.

## ब्रिटिशांच्या राजवटीपूर्वी भारतीय अर्थव्यवस्था :

भा।रतीय अर्थव्यवस्था ही शेतीनिष्ठ अर्थव्यवस्था होती. मीठ व धातुविषयक गरजा वगळता अन्य बाबतींमध्ये भारतीय खेडे स्वयंपूर्ण खेडी म्हणून ओळखले जात. भारतामधील बहुसंख्य (90 टक्यांहुन जास्त) वस्ती हे खेड्यांमध्ये होती. किफायतशीर परदेशी व्यापार, हस्तव्यवसाय आधारित कृषी उत्पादन, तत्कालीन अन्य देशांच्या तुलनेत अधिक समृद्धी परंतु समृद्धीचे असमान वाटप अशा प्रकारची ब्रिटीश राजवटी पूर्वीच्या काळातील भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती होती.

भारतामध्ये इ.स. पूर्व २८०० पासुन इ.स. पूर्व १८०० पर्यंत सिंधू नदीच्या खोऱ्यामध्ये सिंधू संस्कृतीचा विकास झाला. सिंधू नदीच्या खोऱ्यातील या संस्कृतीतील बव्हंशी लोकांचे प्रामुख्याने शहर हेच रहाण्याचे ठिकाण होते. हे लोक उदरनिर्वाहासाठी प्रामुख्याने शेती हा व्यवसाय करीत असत, तसेच प्राणी पाळत असत. तसेच शस्त्रे आणि हत्यारे यांचा वापर करीत. अन्य शहरांशी व्यापार करीत. मापनासाठी हे लोक समान प्रमाणे आणि वजने वापरत. या शहरांमध्ये योजनाबद्ध रस्ते, स्वच्छतेसाठी सोई, तसेच नगरपालिका संस्था असल्याचे पुरावे आहेत, यावरून या लोकांना नगरांचा योजनाबद्ध विकास करण्याचे ज्ञान होते हे समजते. त्यांना त्यांच्या विकासाची

दिशा मिळाली होती.



*गुप्त राजा कुमार गुप्ताच्या (इ.स. ४१४–५५) राजवटीमधील नाणी*

१८७२ च्या जनगणनेनुसार आत्ताच्या भारताच्या प्रदेशामध्ये ९९.३% लोक हे खेड्यांमध्ये रहात असत. या खेड्यांच्या अर्थव्यवस्था बव्हंशी एकमेकांपासून अलग आणि स्वतंत्र होत्या. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय होता. कापड विणणे, खाद्यपदार्थ बनवणे अशा खेड्यातील बाकीच्या हस्त-व्यवसायांच्या गरजा शेतीतूनच पुरवल्या जात. त्यावेळच्या विविध सत्ताधाऱ्यांनी मान्यता दिलेली विविध नाणी प्रचलित होती, पण व्यापारासाठी चलनाचा वापर कमी होत असे. खेड्यातील व्यापार मुख्यत्वे वस्तूविनिमय अथवा मालाच्या अदलाबदलीतूनच होत असे. शेतकरी आपल्या महसूलातील काही भाग सत्ताधाऱ्यांना सोपवीत व हस्तकामगारांना त्यांच्या सेवांबद्दल शेतकऱ्यांकडून हंगामानंतर पिकांच्या उत्पादनातील काही वाटा मिळत असे. ते लोक वस्तू विनिमयाची पद्धत वापरत असल्याने ते माप चुकीचे होते हे क्ष्यात आल्यानंतर त्यांनी त्यात बदल केला.

ह्या अर्थव्यवस्थेच्या घडणीमध्ये धर्म, विशेषत: हिंदू धर्म, तसेच एकत्र कुटुंब पद्धती आणि भारतातील जाती पद्धती यांचीही मोठी भूमिका होती.

भारत हा विविध जातीधार्मानी बनलेला देश आहे.तसेच कुशल कामांच्या ज्ञानाचे पुढच्या पिढीला हस्तांतरण सहज शक्य झाले. काही विशेष व्यवसायांमधील कुटुंब त्याच व्यवसायांमध्ये पिढ्यान् पिढ्या काम करत असल्याने त्या विषयांत अतिशय नैपुण्य मिळवणेही त्यांना शक्य झाले.

भारतामधून मलमल, शाली, कालीकतचे कापड, मिरे, दालचीनी असे मसाल्याचे पदार्थ, तसेच अफू आणि "इंडिगो" ही शाई अशा गोष्टींची मोठ्या प्रमाणात निर्यात युरोपातील तसेच मध्यपूर्वेतील देशांमध्ये होत असे. ह्याच्या बदल्यात भारतात सोने आणि चांदीची आयात होत असे. भारतातून निर्यातीचे प्रमाणही तसे जास्त होते

वसाहतपूर्व भारताच्या अर्थव्यवस्थेच्या मूल्यमापनाबद्दलची परिमाणवाचक माहिती फारशी उपलब्ध नसल्यामुळे फक्त गुणात्मक माहितीच उपलब्ध आहे. परंतु, एका अनुमानानुसार इ.स. १६०० मध्ये अकबराच्या मुघल साम्राज्यातील एकूण महसूल साधारणपणे १.७ कोटी पाउंड इतका होता, तर ह्याच्या तूलनेत ब्रिटनचा इ.स. १८०० मधील एकूण महसूल १.६ कोटी पाउंड इतका होता. ब्रिटिशांच्या आगमनाआधी भारत ही पारंपारीक शेतीवर आणि अप्रगत तंत्रज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था होती. परंतु, ह्याचबरोबर व्यापार, उत्पादन आणि पत ह्यांच्या आर्थिक संकल्पनांची प्रगतीही बरीच झालेली होती. मुघल साम्राज्याच्या अस्तानंतर काही काळ भारताच्या मोठ्या भागावर मराठ्यांचे राज्य होते. ह्या साम्राज्याच्या शिखरावर, इ.स. १७४० मध्ये मराठा साम्राज्याचे आर्थिक अंदाजपत्रक १० कोटी रुपये इतके होते. पानिपतच्या लढाईतील पराभवानंतर मराठा साम्राज्याचे हळूहळू ग्वाल्हेर, बडोदे, इंदूर, झाशी, नागपूर, पुणे, आणि कोल्हापूर अशा छोट्या संस्थानांमध्ये विघटन झाले. ग्वाल्हेर संस्थानाच्या अर्थव्यवस्थेचे अंदाजपत्रक ३ कोटी रुपयाचे होते. परंतु, ह्या काळापर्यंत ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतात चांगलाच जम बसवला होता. १८५७ पर्यंत भारताचा बहुतकरून

प्रदेश ब्रिटिशांच्या राजवटीखाली आला. देशाच्या अर्थव्यवस्थेत अतंर्गत युद्धे आणि तंटे ह्यामुळे खूपच अस्थिरता आली.

## ब्रिटिशांच्या राजवटीमध्ये :

भारतावर दीडशे वर्षे राज्य करणारा ब्रिटन भांडवलशाही देश होता,१८५८ आधी तर प्रत्यक्ष भांडवलदारच (ईस्ट इंडिया कंपनी )इथे राज्य करत होता. त्यामुळे स्वातंत्र्याआधी भारतातही भांडवलशाही अर्थव्यवस्था अस्तित्वात होती .ब्रिटिशांची राजवट सुरू झाल्यापासून करांच्या नियमांमध्ये आणि करवसूली पद्धतीमध्ये भारतात मोठे बदल झाले. याचा सर्वात जास्त परिणाम भारतातील शेतकऱ्यांवर झाला. ब्रिटिशांच्या काळातील करांच्या काहीशा जाचक नियमांमुळे भारतातील शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दारिद्र्य वाढीस लागले. ब्रिटिशांनी अर्थव्यवस्थेमध्ये इतरही काही महत्त्वाचे बदल केले. ब्रिटिश वसाहती राजवटीने ह्या वसाहतकर्त्यांना मालमत्ता बाळगण्याच्या हक्काची हमी देऊ केली. त्यांनी खुल्या व्यापाराला प्रोत्साहन दिले. ब्रिटिशांनी भारतात समान चलन प्रचलित केले, तसेच चलनांच्या विनिमय दरातील बंधने हटवली. वजने आणि मापे यांसाठी समान प्रमाणपद्धती त्यांनी प्रचलित केली. भांडवली बाजारपेठा आणि व्यापार, लोहमार्ग आणि तारसेवा यांचा विकास, राजकारण्यांपासून स्वतंत्र असे नागरी व्यवस्थापन, आणि समान कायदेपद्धती आणि न्यायसंस्था अशा काही गोष्टी त्यांनी सुरू केल्या.[१५] भारतातील ब्रिटिशांच्या राजवटीच्या काळातच बाह्य जगात मोठे आर्थिक बदल होत होते, ह्याच काळात जगात मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झाले, तसेच उत्पादनक्षमता आणि व्यापार ह्यात प्रचंड वाढ झाली. परंतु, ह्या राजवटीच्या शेवटी जगातील अतिशय गरीब अर्थव्यवस्थांपैकी एक, असा वारसा घेऊन भारत स्वतंत्र झाला.[१६] भारत स्वतंत्र झाला तेव्हा, औद्योगिक विकास जवळजवळ थांबला होता, शेतीचे

उत्पादन वाढत्या लोकसंख्येला अपुरे होते, सरासरी आयुर्मानात आणि राहणीमानात भारत जगात तळाशी होता, आणि साक्षरतेचा दरही अतिशय कमी होता.

## ब्रिटिश राजवटीची भारतीय अर्थव्यवस्थेवरील काही परिणाम

1). कृषी तर हस्तव्यवसाय आधारित उद्योगांचा रास.

2). बेरोजगारी व त्याचा कृषी क्षेत्रावर वाढता दाब.

3). जमीन महसुलाचा वाढलेला दर.

4). शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा.

5). सावकार जमीनदार व ब्रिटिश शासन यांच्याकडून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक.

6). परदेशी व्यापार, पक्के रस्ते, रेल्वे, पोस्ट, टेलिग्राम, टेलिफोन, इत्यादी नव्या वाहतूक व संदेशवहन साधनांची सुरुवात.

7). आर्थिक शोषणातून संपत्तीची लूट.

8). शेतीचे व्यापारीकरण खुले आयात धोरण ,अत्यंत अल्प आयातकर. ब्रिटिश उद्योगांना अनुकूल धोरण.

9). आर्थिक एकीकरण व देशपातळीवरील बाजारपेठेची निर्मिती.

## स्वातंत्र्यानंतर चे भारतीय अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप:

भारताच्या स्वातत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या आर्थिक धोरणावर ब्रिटिश राजवटीमधील अनुभवांचा बराच परिणाम दिसून येतो. अनेक वर्षांच्या

परकीय राजवटीमुळे ब्रिटिशांची धोरणे ही पिळवणुकीसमान होती असे सुरुवातीच्या भारतीय नेत्यांचे व धोरणकर र फेबियन समाजवादाचाही बराच प्रभाव होता. त्यामळे भारतातील सुरुवातीची आर्थिक धोरणे स्वदेशी उद्योगांना सरकारकडून संरक्षण यासारख्या (Protectionism) समाजवादी कल्पनांवर आधारित होती.

स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्था ही मिश्र अर्थव्यवस्था (समाजाचा कल असलेली) स्वरूपात विकसित झाली.  या अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र असे दोन्ही प्रकार अस्तित्वात येऊन सार्वजनिक क्षेत्राला प्राधान्य देण्यात आले. 1991मध्ये समाजवादी धोरणांचा त्याग करण्यास सुरुवात झाली भांडवलशाही (आर्थिक दृष्ट्या उदारमतवादी) धोरणांचा अंगिकार करण्यात आला. त्यामुळे खाजगी क्षेत्राला प्राधान्य मिळाले आहे. सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार थांबून त्यांचा संकोच होऊ लागला आहे.

१९९० नंतर विकसनशील देशांमधील सर्वात समृद्ध अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून भारत ओळखला जाऊ लागला आहे. यानंतरच्या काळात भारताची अर्थव्यवस्था सातत्याने आणि वेगाने वाढत आहे. त्याचबरोबर भारतातील सरासरी आयुर्मान व साक्षरता ह्यांसारख्या इतर अर्थ-सामाजिक परिमाणांमध्येही सुधारणा होताना दिसत आहे.

## १९९१ नंतर :


१९८० च्या दशकाच्या अखेरीस राजीव गांधींच्या सरकारने उद्योगांवरचे नियंत्रण कमी करण्यास सुरुवात केली. सरकारने किमतींचे नियमन करणे कमी केले आणि उद्योगांवरचा करही कमी केला. यामुळे विकासदर वाढण्यास सुरुवात झाली, परंतु त्यामुळे सरकारी महसूलातील तूट वाढली आणि सरकारच्या चालू खात्याचे स्वास्थ्यही बिघडायला लागले. शिवाय त्या वेळचा भारताचा व्यापारातील मोठा भागीदार असलेल्या सोविएट

युनियनच्या अस्तामुळे आणि आखाती युद्धामुळे वाढलेल्या कच्च्या तेलाच्या किमतींमुळे भारतापुढे आयात-निर्यातीच्या समतोलाचा (Balance of payments) मोठा प्रश्न निर्माण झाला. बाह्य देशांकडून घेतलेले कर्ज भारत वेळेवर परत फेडू शकेल की नाही अशी शंका उत्पन्न झाली. ह्याला प्रतिसाद म्हणून तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव आणि त्यांचे अर्थमंत्री मनमोहन सिंग ह्यांनी आर्थिक उदारीकरण करण्यास सुरुवात केली. आर्थिक सुधारांबरोबरच परवाना राजवट बंद झाली आणि सार्वजनिक उद्योगांची मक्तेदारी संपून विविध क्षेत्रांमधील परकीय व खाजगी गुंतवणुकीचा मार्ग खुला झाला. तेव्हापासून सत्ताधारी पक्ष कोणताही असला तरी सुधारांची सर्वसाधारण दिशा तीच राहिली आहे. परंतु, कोणत्याही पक्षाच्या सरकारने शेतीच्या अनुदानातील घट अथवा कामगार कायद्यातील सुधार ह्यासारख्या वादग्रस्त मुद्द्यांचा सामना करणे टाळले आहे.

१९९० नंतर विकसनशील देशांमधील सर्वात समृद्ध अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून भारत ओळखला जाऊ लागला आहे. यानंतरच्या काळात भारताची अर्थव्यवस्था सातत्याने आणि वेगाने वाढत आहे. त्याचबरोबर भारतातील सरासरी आयुर्मान व साक्षरता ह्यांसारख्या इतर अर्थ-सामाजिक परिमाणांमध्येही सुधारणा होताना दिसत आहे.

१९९८ च्या अणुचाचण्यांनंतर भारताला इतर देशांकडून मिळणाऱ्या मदतीवर बंधने लादण्यात आली. ह्यामुळे भारताच्या पत दर्जामध्ये (Credit rating) घसरण झाली. पण त्यानंतर पत दर्जा ठरवणाऱ्या एस अँड पी आणि मूडीज ह्या संस्थानी भारताला परत गुंतवणूकीसाठीची पातळी हा पत दर्जा दिला आहे. २००३ मध्ये गोल्डमन सॅक्स ह्या कंपनीने असे अनुमान केले की भारताचे वार्षिक सकल उत्पन्न २०२० मध्ये फ्रांस आणि इटलीला मागे टाकेल, जर्मनी, रशिया आणि युनायटेड किंग्डम ला २०२५ पर्यंत मागे टाकेल तर जपानला २०३५ पर्यंत मागे टाकेल.

# आर्थिक क्षेत्रे




## शेती:

शेतीच्या एकूण उत्पन्नात भारताचा जगात दुसरा क्रमांक आहे. २००५ मध्ये शेती व लाकूडतोड, जंगल संवर्धन, आणि मासेमारी अशा इतर संबधित व्यवसायांचा भारताच्या वार्षिक सकल उत्पन्नामध्ये १८.६% इतका वाटा होता, आणि या व्यवसायांमध्ये कामगारांपैकी ६०% लोक काम करत होते[४]. वार्षिक सकल उत्पन्नामधील शेतीचा वाटा सतत घटत आहे, परंतु अजूनही शेती हाच अर्थव्यवस्थेचा सर्वात मोठा घटक आहे व भारताच्या अर्थ-सामाजिक विकासामध्ये ह्या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. भारताच्या पंचवार्षिक योजनांमध्ये शेतीला नेहेमी प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच सरकारकडून शेतकऱ्यांना अनुदाने, कर्ज व इतर सोई वेळोवेळी पुरवण्यात आल्या. भारतातील हरितक्रांतीपासून शेती तंत्रज्ञान व सिंचनपद्धती यामध्येही सतत सुधारणा होत आहे. यामुळे, शेतीचे दर-एकरामागील उत्पन्न १९५० पासुन सतत वाढत आहे

भारतातील शेतीच्या तूलनात्मक अल्प उत्पादनक्षमतेची काही कारणे पुढीलप्रमाणे आहेत:निरक्षरता, सर्वसाधारण अर्थ-सामाजिक प्रगतीचा अभाव, जमीन कायद्यातील सुधारणांची संथ गती, आणि शेती-उत्पादनासाठी अकार्यक्षम अथवा अपुऱ्या वित्तसेवा आणि त्याच्या विक्री व वितरणासाठीच्या अपुऱ्या सुविधा.

भारतात शेतजमिनीच्या मालकीचे सरासरी क्षेत्रफळ इतर देशांपेक्षा तूलनेने कमी आहे (२०,००० $m^2$ अथवा कमी). तसेच जमिनीच्या मालकीवरील कमाल मर्यादेचे कायदे आणि काही बाबतीत कुटुंबांतील तंटे ह्यामुळे जमिनीची अधिकच छोटी विभागणी होण्याकडे कल असतो. आणि त्यामुळे छुपी बेरोजगारी वाढते आणि शेतकामगारांची कार्यक्षमता कमी होते.

आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि आधुनिक साधनसामग्री ह्यांचे अंगीकरण भारतात अजूनही हवे तितके झालेले नाही. अशा तंत्रज्ञानाबद्दलचे अज्ञान, साधनसामग्रीच्या जास्त किमती आणि अल्प जमीन असणाऱ्या शेतकर्यांसाठी अशा साधनसामग्रीच्या उपयोगाची अव्यावहरिकता.

शेतीच्या अपुऱ्या जलसिंचन सुविधा. २००१ भारतातील शेतीजमीनीपैकी फक्त ५३.६% जमीन जलसिंचनाखाली होती.[४१] ह्यामुळे शेतकर्यांना अजूनही सिंचनासाठी पावसावर अवलंबून रहावे लागते. चांगला मौसमी पाऊस झाला तर अर्थव्यवस्थेत जोरात सुधारणा होते. दुष्काळाच्या काळात अर्थव्यवस्थेची वाढ मंदावते.[४२] तसेच शेतकर्यांना दिले जाणारे कर्ज नाबार्ड ह्या वित्तसंस्थेकडून नियमित केले जाते. ही भारतातील ग्रामीण विकासाला मदत करणारी मुख्य बँक आहे.

## उद्योग:



कारखान्यांच्या एकूण उत्पादनानुसार क्रमवारीत भारताचा जगात १४ वा क्रमांक आहे. भारताच्या कामगारांमधील १२% लोक औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करतात. औद्योगिक क्षेत्राचे उत्पन्न भारताच्या वार्षिक सकल उत्पन्नाच्या २८% एवढे आहे.[४] आर्थिक सुधारांनतर भारतीय उद्योगांशी विदेशी उद्योगांची स्पर्धा वाढली. याचबरोबर सार्वजनिक उद्योगांसाठी राखून ठेवलेली बरीच क्षेत्रे खाजगी उद्योगांसाठी खुली करण्यात आली. तसेच बऱ्याच सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरणही करण्यात आले. ह्यामुळे उद्योगांमधील स्पर्धा वाढून भारतीय उद्योगांची कार्यक्षमता वाढण्यास मदत झाली आणि जलद गतीने वापरल्या जाणाऱ्या मालाच्या (Fast moving consumer goods) उत्पादनक्षमतेतही प्रचंड वाढ झाली.

भारताच्या खाजगी क्षेत्रातील उद्योगांमध्ये आर्थिक सुधारांपूर्वी औद्योगिक घराणेशाहीचा बराच प्रभाव होता. विदेशी उद्योगांना टक्कर द्यायला ह्या उद्योगपतींना राजकारण्यांशी संबंध राखून त्यांच्याकडून उद्योगांसाठी सवलती घेण्याची गरज पडे. अर्थव्यवस्था खुली झाल्यापासून अशा विशेष सवलती अथवा अनुदाने मिळणे कमी झाले. परंतु यामुळे, विदेशी उद्योगांच्या तूलनेत मागे न पडता, उलट भारतीय उद्योगांची स्पर्धात्मकता वाढत आहे असे दिसते.

## सेवा:

सेवा क्षेत्राच्या उत्पन्नामध्ये भारताचा जगात १५ वा क्रमांक आहे. सेवा क्षेत्रात देशातील २३% कामगार काम करतात. ह्या क्षेत्राचा अलिकडे वेगाने विकास होताना दिसत आहे. १९५१–८० मध्ये सेवा क्षेत्राचा विकास ४.५% इतक्या दराने होत होता. १९९१–२००० ह्या काळात सेवा क्षेत्राचा विकास ७.५% दराने झाला. भारताच्या वार्षिक सकल उत्पन्नामध्ये ह्या क्षेत्राचा सर्वात मोठा (५३.८%) वाटा आहे (२००५). १९५० मध्ये हा वाटा फक्त १५% इतका होता.[४] सेवांमध्ये व्यवसायांसंबधित सेवांच्या (माहिती तंत्रज्ञानाच्या सेवा, माहिती तंत्रज्ञान-उपयोजित सेवा, व्यवसाय प्रणालींच्या बाह्यस्रोताच्या सेवा) उत्पन्नाचा वाटा २००० मध्ये एक तृतियांश इतका होता.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा वेगाने विकास होण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत. पुरवठ्याच्या बाजूस इतर देशांपेक्षा कमी किमतीत काम करणाऱ्या, आणि इंग्रजी बोलता येणाऱ्या उच्चशिक्षित तंत्रज्ञांची मुबलक उपलब्धता हा महत्त्वाचा घटक आहे. तर मागणीच्या बाजूस परकीय ग्राहकांकडून भारतातील स्वस्त आणि चांगल्या प्रतीच्या माहिती तंत्रज्ञान सेवांना वाढती मागणी, तसेच परदेशातील कंपन्यांचा बाह्यस्रोताकडे वाढता कल हे कारण आहे. मात्र, भारतातून होणाऱ्या निर्यातीला हातभार लावण्यास भारतातील माहिती तंत्रज्ञान आणि संबंधित उद्योगांची वाढती भूमिका असूनही, २००३ मध्ये ह्या उद्योगांचा वार्षिक सकल उत्पन्नातील वाटा केवळ १% इतका होता, तसेच ह्या उद्योगांचे एकूण उत्पन्न सेवाक्षेत्राच्या उत्पन्नाच्या १/५० इतकेच होते.

## बँका आणि इतर वित्तसेवा:

भारतातील वित्त वितरण व्यवस्थेची दोन मुख्य अंगे आहेत.

- अधिकृत क्षेत्र - खाजगी, सार्वजनिक व विदेशी बँका व सहकारी बँका.
- अनधिकृत क्षेत्र - सावकार, व्यक्तिशः कर्ज देणाऱ्या पतसंस्था तसेच इतर वित्तसंस्था.

अजूनही भारतातील ग्रामीण आणि उपनगरी भागात, सणासुदीला किंवा कार्यप्रसंगी बँकांकडून कर्ज न घेता अनधिकृत क्षेत्रातील व्यक्तींकडून पैसे घेणे पसंत केले जाते.

पंतप्रधान इंदिरा गांधींनी १९६९ मध्ये १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यानंतर, १९८० मध्ये अजून ६ बँकांचा ह्यात समावेश करण्यात आला. ह्याचबरोबर बँकांना आपल्या एकूण पतपुरवठ्यापैकी ४०% (आताचा दर १०%) पत शेती, लघुउद्योग, किरकोळ व्यापार अशा विशेष क्षेत्रांसाठी राखून ठेवणे बंधनकारक केले गेले. बँकाच्या एकूण शाखा १९६९ मधील १०,१२० पासुन २००३ मध्ये ९८,९१० इतक्या वाढल्या आहेत, तर प्रत्येक शाखेमागची ग्राहकसंख्या याच काळात ६३,८०० पासुन १५,००० इतकी घटली आहे. बँकाच्या एकूण ठेवींमध्ये १९५१–१९७१ मध्ये ७ पट वाढ झाली, तर १९७१ पासुन १९९१ पर्यंत ठेवींमधील वाढ ३२.६ पट एवढी होती. बँकाच्या ग्रामीण शाखांमध्ये जरी १९६९ मधील १,८६० अथवा एकूण शाखांच्या २२% पासुन ३२,२७० अथवा ४८% एवढी वाढ झाली असली, तरी देशातील पाच लाखांपैकी ३२,२७० खेड्यांमध्येच अधिकृत बँकांच्या शाखा आहेत.

अर्थव्यवस्था खुली करायला सुरुवात केल्यापासून भारत सरकारने बँकांच्या सेवांमध्येही मोठ्या प्रमाणात आर्थिक सुधारांना मान्यता दिली आहे. यातील काही सुधार (जसे, विलीनीकरणास प्रोत्साहन, सरकारचा हस्तक्षेप कमी करणे, व नफा, कार्यक्षमता आणि स्पर्धात्मकता वाढवण्यावर भर) राष्ट्रीयीकृत बँकांशी संबधित आहेत, तर इतर सुधारांमध्ये बँका आणि विम्याच्या सेवांमध्ये खाजगी व परकीय सहभागावर भर देण्यात आला आहे.

# अर्थव्यवस्थेमधील सरकारची भूमिका

## सरकारी योजना व मिश्र अर्थव्यवस्था

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने केंद्रित नियोजनाच्या अर्थव्यवस्थेचा अवलंब केला. अर्थव्यवस्थेचा समतोल विकास व्हावा, तसेच देशाच्या नैसर्गिक संपत्तीचा सर्वांना समान उपयोग व्हावा असा यामागचा उद्देश होता. हे अर्थव्यवस्थेचे नियोजन पंचवार्षिक योजनांद्वारे होते. पंतप्रधानांच्या हाताखालील योजना आयोग हा विभाग हे काम पार पाडतो.

शेतीव्यतिरिक्त व्यवसायामधील खाजगी व सार्वजनिक क्षेत्रांत काम करणाऱ्या लोकांची संख्या. खाजगी क्षेत्रातील शेतीव्यतिरिक्त उद्योगांची माहिती १० अथवा अधिक कामगार असलेल्या उद्योगांबद्दल आहे.

भारताची अर्थव्यवस्था ही मिश्र अर्थव्यवस्था आहे. अर्थात, ह्यात भांडवली अर्थव्यवस्था आणि समाजवादी अर्थव्यवस्था दोन्हीमधील कल्पनांचा समावेश केला गेला आहे. पण मागील दशकात, भारताची अर्थव्यवस्था हळूहळू भांडवली अर्थव्यवस्थेकडे झुकत आहे असे दिसते. लोहमार्ग, टपालसेवा आणि काही अतिमहत्त्वाच्या सेवा, तसेच ज्यांची खाजगी क्षेत्रामध्ये नफा होण्याची शक्यता कमी, अशा गोष्टी सर्वसाधारणपणे सार्वजनिक क्षेत्राकडे देण्यात येतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, बँकांसारखी क्षेत्रे राष्ट्रीयीकरण आणि खाजगीकरण अशा अवस्थांमधून गेली आहेत, परंतु अलीकडे खाजगीकरणाचे वारे जास्त वाहताना दिसून येतात.

## सार्वजनिक गुंतवणूक आणि खर्च

भारताच्या सार्वजनिक खर्चाचे विकासकामांवरील खर्च आणि विकासाव्यतिरिक्त कामांवरील खर्च असे वर्गीकरण करता येईल. विकासकामांच्या खर्चात केंद्राच्या योजनांवरील खर्च आणि केंद्राकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीवरील खर्च यांचा समावेश होतो. या दोन्ही वर्गांची भांडवली खर्च आणि महसूली खर्च अशी अजून विभागणी करता येते. केंद्राच्या योजनांवरील खर्च हा केंद्र सरकारच्या विविध विकासयोजनांसाठी राखून ठेवलेला असतो, तर केंद्राकडून मिळणारी आर्थिक मदत ही राज्यांना आणि केंद्रशासित प्रदेशांना विकासकामांसाठी मदत व विकासासाठी कर्ज म्हणून राखून ठेवलेली असते.

## सार्वजनिक आय व कर व्यवस्था

भारतात तीन-पदरी करव्यवस्था आहे. भारताच्या राज्यघटनेने केंद्रसरकारला आयकर, गुंतवणुकीवरील कर (संपत्तीवरील कर व वारसाहक्काने मिळालेल्या संपत्तीवरील कर), विक्रीकर, सेवांवरील कर, आयातकर व अबकारी कर वसूल करण्याचा अधिकार दिला आहे, तसेच राज्यांना मालाच्या आंतरराज्यीय विक्रीवरील कर, करमणूक कर, व्यवसाय कर, मद्य-उत्पादनावरील अबकारी कर, तसेच मालमत्तेच्या हस्तांतरावरील स्टँप ड्युटी वसूल करण्याचा अधिकार दिला आहे. याचबरोबर राज्यसरकारकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना मालमत्ता कर व जकात कर वसूल करण्याचा, तसेच पाणी व स्वच्छतेच्या सोयींसारख्या सार्वजनिक सेवांसाठी किंमत वसूल करण्याचा अधिकार दिला गेला आहे.[३०][३१] राज्य व केंद्रसरकारला मिळणाऱ्या महसूलामधील अर्धा भाग करांद्वारे येतो, आणि त्यापैकी अर्धा अप्रत्यक्ष करांद्वारे येतो. केंद्रसरकारच्या महसूलातील एक-चतुर्थांशाहून

अधिक भाग राज्यसरकारांबरोबर वाटला जातो.

# आर्थिक विकासासाठी पंचवार्षिक योजना

| **योजना** | आर्थिक तरतूद **(कोटी रुपयात)** | उद्दिष्टे |
|---|---|---|
| पहिली योजना (1951-56) | सुमारे 2000 | 1. दुसरे महायुद्ध व देशाची फाळणी यामुळे प्रभावित झालेल्या अर्थव्यवस्थेची घडी बसवणे.<br>2. शेती उत्पादन वाढवणे. |
| पाचवी योजना (1992-97) | 4,34,100 | 1. रोजगार वृद्धी व संपूर्ण रोजगारी च्या दिशेने वाटचाल.<br>2. लोकसंख्या नियमन.<br>3. शेती क्षेत्राचा विकास.<br>4. पिण्याचे पाणी व आरोग्य सेवा यांची खेड्यात उपलब्धी. |
| दहावी योजना (2002-07) | 36,44,718 | 1. दारिद्र्य निर्मूलन 2. रोजगार वृद्धी सर्व 3.मुलांना शिक्षण 4. लोकसंख्या नियमन 5. 75 टक्के पर्यंत साक्षरतेत वाढ 6. वनविस्तर |

| | | |
|---|---|---|
| अकरावी योजना (2007-12) | 36,44,718 | 1. वैद्यकीय सेवांचा दर्जा सुधारणे 2. अन्न सुरक्षितता साध्य करणे 3. कृषी संशोधनावर भर 4. ग्रामीण विकास व रोजगार हमी साधने 5. विद्युतीकरण 6. अनु उर्जा विकास |

# पंचवार्षिक योजनेची परिणाम

## 1. विधायक परिणाम:

1.देशात मोठ्या प्रमाणावर उद्योगधंद्यांचा विकास झाला

2. लोखंड, पोलाद ,मशिनरी, रेल्वे इंजिन ,मोटर ,इलेक्ट्रॉनिक वस्तू ,औषधे व रसायने रासायनिक खते ,साखर ,लष्कर उपयोगी रणगाडे ,विमाने युद्धनौका इत्यादी चे उत्पादन तसेच खनिज तेल उद्योग यात बरीच प्रगती झाली.

3. अनु विज्ञान व अंतराळ संशोधन यात मोठी प्रगती झाली.

4. शिक्षणाचा विस्तार झाला.

5. सरासरी आयुर्मानात जवळपास दुपटीने वाढ झाली.

6. दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या संख्येत घट.

7. दूरसंचार क्षेत्रात मोठी प्रगती.

8. नियोजनबद्ध विकास साध्य.

## 2. अनिष्ट परिणाम:

1).सार्वजनिक उद्योग कार्यक्षमते ने न चालल्याने काही अपवाद वगळता, ते सातत्याने तोट्यात राहिले.

2).विकासाचा दर सातत्याने दोन ते तीन टक्के राहीला.

3).परदेशी कर्जाचा बोजा वाढला.

4).चलन फुगवटा व किंमतवाढ सारखी घट.

# वित्त संस्था



रिझर्व बँकेचे मुंबईमधील मुख्यालय

ब्रिटिशांनी त्यांच्या राजवटीत भारतात नागरी सेवा, भारतीय रिझर्व बँक, भारतीय रेल्वे अशा बऱ्याच सेवा चालू केल्या होत्या, स्वातंत्र्यानंतर भारतात त्या सेवा पुढे चालू राहिल्या. मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी मानली जाते. भारतीय रिझर्व बँक, बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज, आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ह्या महत्त्वाच्या संस्थांची मुख्यालये मुंबईत आहेत. तसेच बऱ्याच इतर खाजगी व सार्वजनिक वित्तसंस्थांची मुख्यालयेही मुंबईत आहेत.

रिझर्व बँक ही भारतातील मुख्य बँक आहे. एप्रिल १, १९३५ मध्ये रिझर्व बँकेची स्थापना झाली. भारतातील आर्थिक व्यवस्थांची देखरेख करणे, देशाच्या वित्तधोरणाचे नियमन करणे, परकीय चलनांचे व्यवहार सांभाळणे, तसेच भारतीय चलनाचे वाटप करणे अशी रिझर्व बँकेची काही कामे आहेत. एक केंद्रीय मंडळ रिझर्व बँकेच्या व्यवस्थापनाचे काम पाहते. रिझर्व बँकेच्या व्यवस्थापकांची नियुक्ती केंद्रसरकारद्वारे होते. उर्जित पटेल हे रिझर्व बँकेचे सध्याचे व्यवस्थापक आहेत.

भारतातील शेयरबाजारातील बहुसंख्य व्यवहार बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज या दोन कंपन्यांच्या शेयर विनिमय सेवांद्वारे होतात. BSE Sensex अथवा Sensitive-index हा बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजमधील ३० कंपन्यांच्या शेयर किमतींचे त्यांच्या महत्त्वाप्रमाणे सरासरी मूल्य दर्शविणारा निर्देशांक आहे.@@@@ या निर्देशांकात एप्रिल, १९७९ हे वर्ष पाया (१००) म्हणून मानले गेले आहे. या ३० कंपन्या शेयरबाजारातील मोठ्या व सर्वाधिक व्यवहार होणाऱ्या कंपन्या आहेत. विविध उद्योगक्षेत्रातील कंपन्यांना यात प्रातिनिधित्व देण्यात आले आहे. या कंपन्यांचे एकूण बाजार मूल्य शेयर बाजारातील सर्व कंपन्यांच्या साधारण एक पंचमांश इतके आहे. भारतात एकूण २३ शेयरबाजार आहेत, परंतु बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज, आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज मध्ये देशातील ८३% शेयर व्यवहार होतात.[३९] सेबी अथवा सेक्योरिटिज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया ही १९९२ मध्ये स्थापित संस्था देशातील शेयरबाजार आणि इतर कर्जरोख्यांच्या बाजारांचे नियमन करते.

# लॉकडाऊन चा अर्थव्यवस्थेवरील परिणाम

देशात करोना व्हारसचा प्रादुर्भाव अजूनही वाढत आहे. देशातील करोना रुग्णांची एकूण संख्या साडेचार लाखांवर गेली आहे. हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सरकारने लॉकडाऊन घोषित केला होता. हा लॉकडाऊन दीर्घकाळ चालल्याने त्याचा अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला आहे. या वर्षी भारताचा आर्थिक विकासदर हा ४.५ टक्क्यांनी घसरेल असा अंदाज आयएमएफने वर्तवला आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी भारतीय अर्थव्यवस्थेवर या वर्षाचा धक्कादायक अंदाज व्यक्त केला आहे. २०२० मध्ये भारतीय अर्थव्यवस्था ४.५ टक्क्यांनी घसरेल आणि हे घसरण ऐतिहासिक असेल, असं नाणेनिधीने म्हटलंय. करोना व्हायरचा प्रादुर्भाव रोखण्यात आर्थिक उलाढाल ठप्प झाली. यामुळे ही मोठी घसरण होऊ शकते, असा अंदाज व्यक्त केला गेला आहे. पण यासोबतच २०२१मध्ये भारतयी अर्थव्यवस्थेत मोठी तेजी असेल आणि आर्थिक विकासदर हा ६ टक्क्यांपर्यंत जाईल, असा दिलासाही नाणेनिधीने दिला आहे.

## पहिल्या सहामाहीची स्थिती वाईट:

करोना व्हायरसच्या संकटाचा २०२० मधील पहिल्या सहामाहितील आर्थिक उलाढालीवर नकारात्मक परिणाम झाला. अपेक्षेपेक्षा जास्त व्यापक परिणाम दिसून आला. तर २०२१ मध्ये जागतिक वृद्धी दर हा ५.४ टक्के असेल, असा अंदाज आहे. हा आधी वर्तवलेल्या अंदाजापेक्षा कमी आहे. २०२० मध्ये पहिल्यांदाच सर्व क्षेत्रात घसरण दिसून येणार आहे. चीनच्या

आर्थिक विकासात पहिल्या तीमाहीनंतर सुधारणा होत आहे. यानुसार २०२० मध्ये चीनचा वृद्धी दर हा १.० टक्के असेल, असा अंदाज आहे.

## अधिक दिवसांच्या लॉकडाऊनचा परिणाम:

भारतीय अर्थव्यवस्था ४.५ टक्क्यांनी घसरेल. याचा कारण अधिक काळ सुरू असलेला 'लॉकडाऊन' आणि एप्रिलमध्ये अंदाजाच्या उलट अर्थव्यवस्थेची मंदावलेला वेग. १९६१ नंतर भारतीय अर्थव्यवस्थेत प्रथमच इतकी घसरण झालेली असेल. आयएमएफजवळ त्यापूर्वीचे आकडे नाहीएत. पण २०२१ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत तेजी असेल. ही आर्थिक विसदार ६.० टक्क्यांनी वाढेल, असा आयएमएफचा अंदाज आहे. २०१९ मध्ये भारताचा विकासदर हा ४.२ टक्के इतका होता.

# भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

## 1). कृषी विकास:

भारतीय कृषी क्षेत्र हे आता एका परिवर्तनाच्या वळणावर येऊन ठेपले आहे. भारतीय कृषी क्षेत्र अनेक समस्यांशी झुंजत असले तरीही अनेक आघाड्यांवर भारतीय शेतकऱ्यांनी नेत्रदीपक कामगिरी केली आहे. त्यांनी एक हरितक्रांती यशस्वी केली आहे. आणि आता शेती क्षेत्राला आणि पर्यायाने संपूर्ण अर्थव्यवस्थेला विकासाच्या पुढच्या टप्प्यावर नेण्यासाठी दुसऱ्या हरितक्रांतीची तयारी केली जात आहे. अनेक कृषी उत्पादनाबाबत भारत जगात अग्रस्थानी आहे.
चहा,गहू,तांदूळ,ऊस,ताग,कापूस,फळे ,भाजीपाला ,यांच्याउत्पादनात भारताचा समावेश आघाडीच्या देशांमध्ये होतो. जगात सर्वाधिक पशुधन भारतात आहे. दुग्ध उत्पादनातभारत अग्रस्थानीदेशांमध्ये समाविष्ट आहे. कृषी क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळेआर्थिक विकासाचा वेग निश्चितपणे वाढला आहे.

## 2). सेवा क्षेत्राचा विकास:

सेवा क्षेत्राचा विकास हे विकसित अर्थव्यवस्थेचे एक प्रमुख लक्षण आहे. भारतातही सेवा क्षेत्राचा वेगाने विकास होत असल्याचे दिसते. जागतिकीकरण व उदारीकरणाच्या काळात सेवा क्षेत्राच्या विकासाला चालना

मिळाली आहे . एकूण राष्ट्रीय उत्पादन सेवा क्षेत्राचा वाटा वाढत असून सन 2013 मध्ये 65 टक्के पर्यंत पोहोचला हे पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेमुळे वाहतूक क्षेत्राचा विकास झाला. हे संदेशवहन क्रांतीमुळे टेलिफोन ,मोबाईल सेवांचा विकास झाला आहे. देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारात ही वाढ होत आहे.

## 3). माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती:

भारतात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीमुळे खऱ्या अर्थाने भारताला एक प्रगतशील अर्थव्यवस्था म्हणून मान्यता मिळाली आहे. या क्षेत्रातील प्रगतीमुळे केवळ परकीयच चलनांच्या रूपाने मिळणाऱ्या उत्पादनात भरीव वाढ झाली आहे असे नाही तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही देशाची पत वाढली आहे. बी. पी. ओ. कॉल सेंटर यांच्या माध्यमातून जागतिक अर्थव्यवस्था यांचे नियंत्रणच भारतीय तरुणांच्या हाती काही माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाचा प्रचंड साठा भारताकडे आहे व तत्सम सेवांची निर्यात मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळते एकूणच या क्षेत्रातील भारताची कामगिरी नेत्रदीपक असेच आहे.

## 4). लोकसंख्येचा वाढता दर्जा:

लोकसंख्या हे मानवी भांडवल समजले जाते. सुशिक्षित व कार्यक्षम वयोगटातील लोकसंख्या ही भारतीय लोकसंख्या ची प्रमुख लक्षणे आहेत. जीवनावश्यक वस्तूंचा अपुरा पुरवठा, आरोग्य व शिक्षणविषयक सोयीची अपुरी उपलब्धता, वाढती लोकसंख्या, शासकीय धोरणांची व योजनांची अकार्यक्षम अंमलबजावणी ,जनतेचे अपुरे उत्पन्न यामुळे जनतेच्या

राहणीमानावर विपरीत परिणाम झाला. परिणामी मानवी संशोधनांचा दर्जा घसरला गेल्या काही वर्षात मानवी संसाधनांचा दर्जा वाढविण्याच्या दिशेने जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले. औद्योगीकरण व कृषी विकासामुळे जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता वाढली आहे. एकूण राष्ट्रीय उत्पादनात व दरडोई उत्पादनात वाढ झाल्याने जनतेचे उत्पन्न वाढले आहे. यामुळे जनतेची क्रयशक्ती वाढली आहे. परिणामी जनतेच्या राहणीमानात वाढ झाली आहे जी एन एन यु आर योजना सुवर्ण जयंती ग्राम रोजगार योजना अशा योजना मार्फत शहरी व ग्रामीण भागांचा विकासकरण्यासाठीजाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत. अर्थात भ्रष्टाचारवाढती लोकसंख्या उत्पादनाच्या वाटपातील विषमता बत्तीस वर्ष होते. ते 2015 मध्ये सरासरी 66 वर्षे इतके झाली साक्षरतेचे प्रमाणही वाढत असून 1951मध्ये साक्षरतेचे प्रमाण केवळ 18 टक्के होते. तेच 2011साली 73 टक्के इतकी वाढली त्यामुळे लोकसंख्या चा दर्जा वाढत आहे.

## 5). शहरीकरणाचा वाढता वेग:

जागतिकीकरण व उदारीकरणाच्या प्रारंभीच्या काळात देशात शहरीकरणाचा वेग मंद होता. परंतु या नंतरच्या काळात शहरांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास व रोजगाराच्या वाढत्या संधी मुळे भारतात शहरांकडे स्थलांतर करण्याच्या प्रमाणात वाढ झाली. असून शहरीकरणाचा वेगही वाढत आहे जवळपास 32 टक्के लोक शहरात राहतात.

## 6). तरुण वर्गाची वाढती संख्या:

भारतातील 50 टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या ही 25 वर्षाखालील

आहे. 35 वर्षांपेक्षा कमी असलेल्या लोकांचे प्रमाण 65 टक्के पेक्षा जास्त आहे. इतर कोणत्याही देशापेक्षा ही प्रमाण जास्त आहे. कार्यक्षम लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. कार्यक्षम लोकसंख्येचे प्रमाण जास्त असल्यामुळे आर्थिक विकासास जास्त चालना मिळते.

## 7). स्थलांतरित भारतीयांची वाढती संख्या

कुशल व अर्धकुशल भारतीय कर्मचाऱ्यांना जगात सर्वत्र मागणी आहे. विशेषतः संगणक क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ यामुळे ही मागणी वाढली आहे. त्यामुळे लक्षावधी भारतीय लोकांनी परदेशात स्थानांतरण केले आहे. अमेरिका ,कॅनडा ,मध्यपूर्वेतील देश, अशा देशांमध्ये स्थलांतरित भारतीयांचे प्रमाण अधिक असून ते लोक परकीय चलन मिळवून देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावत आहेतच शिवाय देशासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरही दबावगट म्हणूनही ते भूमिका पार पाडत आहेत.

## 8). उद्योग प्रधान अर्थव्यवस्था:

अगदी अलीकडच्या काही वर्षापर्यंत भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जात. असे परंतु आता परिस्थिती बदलली असून आपल्या अर्थव्यवस्थेचे उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेत रूपांतर झाले आहे. एकूण राष्ट्रीय उत्पादनात औद्योगिक क्षेत्राचा वाटा सर्वाधिक झाला आहे. भारतात लोहपोलाद ,अभियांत्रिकी ,रसायने ,खतनिर्मिती, औषध निर्मिती ,प्लास्टिक, वस्त्रोद्योग, अशा विविध उद्योगांच्या मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. उद्योग क्षेत्रात कार्यरत लोकसंख्येमध्ये लक्षणीय वाढ होत आहे. जगातील जवळजवळ सर्व देशांना भारत औद्योगिक उत्पादनाची निर्यात करतो.

शासनांच्या प्रोत्साहनपर धोरणांमुळे औद्योगिक क्षेत्राचा उत्तरोत्तर विस्तार होत आहे.

## 9). आंतरराष्ट्रीय संबंध:

भारताच्या सुसंवादाचा व सहकार्याचे भूमिकेमुळे तसेच भारताच्या वाढत्या आर्थिक व लष्करी सामर्थ्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे भूमिकेची दखल घेतली जात आहे. यामुळे आसियान ब्रिक्स जी-7 जी-20 आंतरराष्ट्रीय संघटनांचे सदस्यत्व भारताला बहाल केले गेले आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर भारताची पत वाढली.

## 10). आत्मनिर्भरतेचे धोरण:

भारताने कृषी ,उद्योग ,औषधनिर्माण ,संरक्षण ,अंतराळ ,मनोरंजन, विज्ञान तंत्रज्ञान ,अशा सर्वच क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या विविध क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती करणे शक्य झाले आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक सामर्थ्यात वाढ झाली आहे.

# भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रकार

## १). भांडवलशाही अर्थव्यवस्था :

ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादनाची सूत्रे खाजगी भांडवलदारांच्या हातात असतात, ती अर्थव्यवस्था 'भांडवलशाही अर्थव्यवस्था' म्हणून ओळखली जाते. देशकालपरत्वे या अर्थव्यवस्थेच्या स्वरूपात काही फरक आढळून येतात. तात्विक दृष्टया ज्या अर्थव्यवस्थेचे निखळ भांडवलशाही असे वर्णन करता येईल, अशा स्वरूपाची भांडवलशाही अर्थव्यवस्था आज जी विशेषत्वाने भांडवलशाही राष्ट्रे म्हणून ओळखली जातात, अशा अमेरिकेची संयुक्त संस्थाने किंवा पश्चिम जर्मनी यांसारख्या राष्ट्रांतूनही अस्तितिवात आहे, असे म्हणता येणार नाही. परंतु भांडवलशाहीचे आजचे स्वरूप समजून घेण्यापूर्वी तिचे मूळ स्वरूप व तिची गत इतिहासकालातील वाटचाल यांचा आधी विचार केला पाहिजे.

औद्योगिक भांडवलशाहीचा उदय इंग्लंडमध्ये अठराव्या शतकाच्या अखेरीस झाला. यापूर्वीचा यूरोपच्या इतिहासातील सु. चार शतकांचा कालखंड हा 'व्यापारी भांडवलशाही'चा (मर्चंट कॅपिटॅलिझम) कालखंड म्हणून ओळखला जात असला, तरी या कालखंडात विविध कारणांनी झालेल्या व्यापार विकासामुळे व्यापारी वर्गाच्या हातात संचित झालेले

धन, एवढेच या कालखंडाचे प्रमुख वैशिष्टय होते. व्यापाराच्या विस्ताराबरोबरच वस्तूंचा पुरवठा वाढविण्याची गरज भासू लागली होती. ही गरजच पुढे शोधांची जननी ठरली आणि अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमध्ये अनेक यंत्रांचा शोध लागला. याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे या शोधामुळे नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात् करून उत्पादनाचे प्रश्न सोडविता येतात, असा आत्मविश्वास मानवाच्या ठिकाणी प्रथम इंग्लंडमध्ये व नंतर क्रमाक्रमाने प्रगत होत गेलेल्या इतर राष्ट्रांमध्ये निर्माण झाला. यांत्रिक उत्पादनाचे तंत्र हस्तगत झाल्यानंतर मानव त्याच्याकडे पाठ फिरवील, ही गोष्ट शक्य नव्हती.

परंतु मोठमोठ्या यंत्रांच्या साहाय्याने उत्पादनाला सुरुवात झाल्यानंतर त्याच्या आधीचे अर्थव्यवस्थेचे स्वरूपच बदलून गेले. हा बदलही अटळ असाच होता. याआधी अस्तित्वात असणारी अर्थव्यवस्था ही सरंजामदारी किंवा सामंतशाही पद्धतीची होती. त्या अर्थव्यवस्थेत मुख्य उत्पादन हे शेतीचे होते व शेतीच्या क्षेत्रात सरंजामदारांच्या, बड्या जमिनदारांच्या हातात सत्ता केंद्रित झालेली होती. औद्योगिक उत्पादन तुलनेने मर्यादित होते व ते मुख्यत्वेकरून छोटया, प्राथमिक स्वरूपाच्या यंत्रांच्या साहाय्याने स्वतंत्र व्यावसायिक कारागीर करीत असत. या कारागिराला आपली स्वतःच्या मालकीची साधने वापरणे शक्य असे व त्यामुळे कोणाचाही गुलाम म्हणून न राहता किंवा केवळ वेतन घेऊन काम करणारा मजूर, ही भूमिका घ्यावी न लागता तो स्वतंत्र कारागीर म्हणून त्याला आपला व्यवसाय चालविता येणे शक्य असे. मोठे कारखाने उभारून त्यांच्या साहाय्याने उत्पादनाला सुरुवात झाल्यानंतर

ही शक्यता राहिली नाही. हा कारखाना उभा करण्यासाठी लागणारे भांडवल या कारागिराकडे नव्हते. स्वतंत्रपणे आपला व्यवसाय चालवून या कारखान्याशी कराव्या लागणाऱ्या स्पर्धेत त्याला तग धरता येईल, अशीही परिस्थिती नव्हती. कारण तो उत्पादन करीत असलेला मालच कारखानदार अधिक सुबक आणि अधिक स्वस्त असा निर्माण करीत होता. आपला व्यवसाय मोडकळीस आल्यानंतर एक तर शेतीकडे वळून शेतीवरील भार वाढविणे किंवा शहराकडे कारखान्यांतून कामासाठी मजूर म्हणून जाणे, एवढे दोनच पर्याय या कारागिरांसमोर शिल्लक राहिले.

यांत्रिक शोधांचा परिणाम म्हणून घडून आलेल्या औद्योगिक क्रांतीमुळे खाजगी भांडवलदारांचा एक वर्ग अस्तित्वात आला. हा वर्ग कारखाने उभे करीत असे, मजुरांना वेतन देऊन कामावर लावत असे व शेवटी व्यवसायात येणाऱ्या नफानुकसानीची जबाबदारी स्वीकारीत असे. भांडवलदारवर्गाची स्वाभाविक आर्थिक प्रेरणा ही अधिकाधिक नफा मिळवण्याची होती. औद्योगिक क्रांतीचे हे भांडवलदार प्रवर्तक होते व औद्योगिक क्रांतीमुळे पूर्वीच्या अर्थव्यवस्थेपेक्षा अधिक उत्पादन करता येते, हा प्रत्यक्ष अनुभव सर्वांना येत होता. साहजिकच या वर्गाच्या कार्यकर्तृत्वाला पोषक अशाच स्वरूपाचे विचार आणि आचार त्या काळात पुरस्कारिले जाऊ लागले. या अर्थव्यवस्थेतील दोष पुढे पुढे जसजसे अधिकाधिक अनुभवास येऊ लागले, तसतशी या आचारविचारांत फेरबदल करण्याची आवश्यकता लोकांना वाटू लागली.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या रचनेत मूलत : खालील गोष्टी अभिप्रेत आहेतः (१) या अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने ही खाजगी मालकाची असतात. (२) उत्पादनविषयक सर्व निर्णय खाजगी भांडवलदार अनिर्बंध रीतीने घेऊ शकतात. (३) परचक्रापासून संरक्षण आणि अंतर्गत शांतता व सुव्यवस्था यांचे संस्थापन, एवढीच सरकारची मुख्य कार्ये असतात. सरकारने यापलीकडे जाऊन अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करण्याचे कारण नाही, असा विचार समाजात प्रसृत असतो. (४) प्रत्येकाला आपले हित समजते व प्रत्येकजण आपले हित सांभाळण्याविषयी दक्ष असतो, म्हणून सर्वांना कराराचे मुक्त स्वातंत्र्य दिले की, होणारे करार हे उभयतांना योग्य असेच होतील. या कल्पनेमुळे या अर्थव्यवस्थेत कराराचे स्वातंत्र्य सर्वांना दिले जाते. (५) ग्राहक हा या अर्थव्यवस्थेत सार्वभौम असतो, असे सांगण्यात येते. ग्राहक आपल्याला हव्या असणाऱ्या वस्तूंची मागणी करतो. या मागणीचा व वस्तूंच्या पुरवठ्याचा ताळमेळ पडून बाजारात जी किंमत त्या वस्तूला मिळणे शक्य असेल, तीतून आपल्याला किती प्रमाणात नफा सुटण्याची शक्यता आहे, याचा विचार करुन खाजगी भांडवलदार आपला उत्पादनविषयक निर्णय घेत असतो. उत्पादनक्रियेवर यामुळे ग्राहकांच्या इच्छेचा मोठा प्रभाव राहतो. (६) 'नफा' हे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे कळसूत्र आहे. कोणते उत्पादन कधी, कोणत्या ठिकाणी, किती प्रमाणात करावे यांसारखे सर्व निर्णय भांडवलशाही अर्थव्यवस्था नफ्याच्या शक्याशक्यतेकडे नजर ठेवून करीत असते. हे नफ्याचे प्रमाणे खुल्या बाजारात ठरत असते. यामुळे या अर्थव्यवस्थेत उत्पादविषयक निर्णय आपोआप घेतले जात असतात, त्यासाठी शासनाच्या किंवा नियोजन आयोगाच्या मार्गदर्शनाची गरज लागत नाही. असंख्य वस्तूंचे

उत्पादन कोणीही मध्यवर्ती केंद्रांतून निर्णय न घेता असे आपोआप होत रहावे, या घटनेचेच कित्येकांना इतके आश्चर्य वाटते की, त्यांना त्यात 'ईश्वराचा अदृश्य हात' असण्याचा साक्षात्कार झाला. (७) खाजगी मालमत्तेचा हक्क व वारसाहक्क हे भांडवलशाहीचे मोठे आधारस्तंभ आहेत. कारण त्यामुळेच उत्तरोत्तर संपत्तीचे अधिकाधिक केंद्रीकरण होऊ शकते.

या अर्थव्यवस्थेमुळे, पूर्वीच्या अर्थव्यवस्थेच्या तुलनेत, एकूण उत्पादनात वाढ झाली यात शंकाच नाही. परंतु सर्व मानवांना अधिक सुखी करण्याच्या दृष्टीने तिचे कार्य अपुरे पडत आहे इतकेच नव्हे, तर ते विघातक ठरत आहे असे आढळून येऊ लागले. भांडवलशाहीच्या अगदी सुरुवातीच्या काळातही सहृदय डोळस विचारवंतांनी या अर्थव्यवस्थेत एका बाजूला वैभवशाली इमले रचले जातात, परंतु दुसऱ्या बाजूला असंख्य मानव हीनदीन अवस्थेत जगत असतात, हे दृश्य नीट निरखले होते. परंतु जसजसा काळ लोटू लागला तसतसा भांडवलशाहीच्या दोषांचा अधिकाधिक स्पष्ट असा अनुभव येऊ लागला व त्या अनुभवाची अधिक शास्त्रशुद्ध अशी उपपत्तीही लावली जाऊ लागली.

भांडवलशाहीत आढळून आलेले मुख्य दोष असे :

(१) आर्थिक विषमतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. नफा अधिक मिळविण्याच्या प्रयत्नात भांडवलदार साहजिकच शक्य तितकी कमी

मजुरी देत होते. रॉबर्ट ओएनसारखा एखादा अपवादात्मक भांडवलदारच अधिक उदार धोरणाचा पुरस्कार करीत होता. सरकारचे तटस्थ धोरण, मुक्त कराराच्या तत्त्वाचे अनुसरण व मजुर संघटनेच्या अभाव यांमुळे मजुरांचे हितसंरक्षण करण्याचा कोणताच मार्ग प्रारंभीच्या काळात उपलब्ध नव्हता. कामाचे तास, कामाची परिस्थिती, वेतनमान वा अन्य कोणत्याही बाबतींत काही नियम अस्तित्वात नव्हते, यामुळे अल्पसंख्य धनिक भांडवलदारवर्ग व बहुसंख्य शोषित कामगारवर्ग यांच्यामध्ये आर्थिक विषमतेची फार मोठी दरी निर्माण झाली होती. या वस्तुस्थितीच्या आधारावरच वर्गविग्रहाच्या स्फोटक विचारसरणीची मांडणी कार्ल मार्क्सने केली.

(२) उत्पादनात वाढ करण्याची भांडवलशाही अर्थव्यवस्थेची क्षमता, हा तिचा पूर्वीच्या अर्थव्यवस्थेशी तुलना करता एक महत्त्वाचा मोठा गुण होता. परंतु या कसोटीवरही भांडवलशाही अर्थव्यवस्था काही काळानंतर अपुरी पडते, असे आढळून येऊ लागले. तेजीमंदीच्या चक्रापासून भांडवलशाही अर्थव्यवस्था आपल्याला वाचवू शकत नाही, या चक्रपरिवर्तनाची अपरिहार्यता भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत रचनेत अनुस्यूत आहे आणि मंदीच्या काळात उत्पादन एकदम घटते व उत्पदनाला गती देण्याचा भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा दावाही खोटा पडतो, अशी टीका भांडवलशाहीचे टीकाकार करु लागले.

(३) उत्पादनात वाढ होत असतानाही ती समाजाला सर्वांत इष्ट अशा उत्पादनाच्या क्षेत्रातच होईल, अशी या अर्थव्यवस्थेची ग्वाही राहू शकत नव्हती. ग्राहक हा या अर्थव्यवस्थेत सार्वभौम आहे असे सांगितले जाते, परंतु हे सार्वभौमत्व त्याच्याकडे प्रत्यक्ष क्रयशक्ती जेवढ्या प्रमाणात असेल तेवढ्या प्रमाणातच अस्तित्वात असते. केवळ एखाद्याला गरज आहे म्हणून मागणी निर्माण होत नाही. त्या गरजेच्या माग पुरेशी

क्रयशक्ती नसेल, तर भांडवलशाही अर्थव्यवस्था त्या गरजेची कोणतीच दखल घेत नाही. यामुळेच भांडवलशाही अर्थव्यवस्थेत गरिबांच्या निकडीच्या गरजांच्या वस्तूंचे उत्पादन न होता धनिकांच्या चैनीच्या वस्तूंचे उत्पादन होऊ शकते. यामुळेच जनतेच्या महत्त्वाचा गरजा लक्षात घेऊन उत्पादनक्रम ठरवावा असे वाटत असेल, तर अनिर्बंध भांडवलशाही अर्थव्यवस्थेवर विसंबून राहता येत नाही.

(४) भांडवलशाहीला अभिप्रेत असलेल्या परस्परांतील स्पर्धेमुळे भांडवलदारांकडून ग्राहकांचे शोषण व्हावयाचे टळेल, ही अपेक्षाही फारच भाबडेपणाची ठरली. भांडवलशाहीत कधीकधी स्पर्धा फारच अतिरेकी, जाहिरात आदींवर भरमसाट खर्च करणारी व त्यामुळे सरतेशेवटी ग्राहकाला द्याव्या लागणाऱ्या अधिक किंमतीमुळे त्याचे नुकसान करणारी, अशी हानिकारक पद्धतीची होते, तर कधीकधी अशा जीवघेण्या (कट-थ्रोट) स्पर्धेतून इतर स्पर्धक हळूहळू नाहीसे होतात व शेवटी उरणारा स्पर्धक नंतर मक्तेदार बनून ग्राहकांचे शोषण करतो. या मार्गाखेरज अन्य मार्गानेही भांडवलशाहीत मक्तेदारीकडे वाटचाल करण्याची स्वाभाविक वृत्ती अस्तित्त्वात असते. कारण मक्तेदारी स्थापन झाल्यास युक्त नफ्याच्या प्रमाणाच्या पलीकडे जाऊन मक्तेदारीमुळे शक्य होणारा अतिरिक्त नफा मिळविता येतो. अशा मोठ्या मक्तेदाऱ्या अस्तित्वात आल्या की, त्या व्यवसायात नव्याने प्रवेश करणे अन्य कोणाला अशक्य होते व मुक्त व्यवसायसंधी (फ्री एंटरप्राइज) हा जो भांडवलशाहीचा एक विशेष गुण म्हणून सांगितला जातो, त्यालाही बाधा येते

(५) मक्तेदारी स्थापना करुन नफ्याचे प्रमाण वाढविण्याचा प्रयत्न केल्यास नफ्याच्या प्रेरणेने उत्पादन वाढीला चालना मिळते, या विधानालाही महत्त्वाचा अपवाद निर्माण होतो. उत्पादन कमी करुन जर

अधिक नफा मिळविण्याती शक्यता असेल, तर भांडवलदार उत्पादनावर त्या दृष्टीने मर्यादा घातल्याखेरीज राहणार नाहीत.

(६) भांडवलशाहीचा जसजसा विकास होत जातो, तसतशी ती साम्राज्यशाहीकडे झुकू लागते, असाही भांडवलशाही अर्थव्यवस्थेवरील एक मोठा आरोप आहे.

## २). मिश्र अर्थव्यवस्था:

जी अर्थव्यवस्था केवळ साम्यवादी स्वरूपाची किंवा केवळ खाजगी भांडवलशाही स्वरूपाची नसून, जिच्यात त्या दोन्ही प्रकारांचे मिश्रण आढळते, अशी अर्थव्यवस्था. प्रचलित भारतीय अर्थव्यवस्थेचे वर्णन मिश्र अर्थव्यवस्था असे करतात, कारण सरकारी क्षेत्र व खाजगी क्षेत्र अशी दोन्ही क्षेत्रे एकाच वेळी या अर्थव्यवस्थेत आज अस्तित्वात आहेत. अलीकडे विकास पावत असलेल्या सहकारी क्षेत्राचा समावेश यात केल्यास हा एक त्रिवेणीसंगम आहे असे आढळून येईल.

प्रत्येक अर्थव्यवस्था कमीअधिक प्रमाणात मिश्र अशीच असते. साम्यवादी राष्ट्रात उत्पादनाची सर्व साधने शासनाच्या मालकीची असतात. शेतीचे सामूहिकीकरण झालेले असल्यामुळे खाजगी क्षेत्राचा जवळजवळ लोप झालेला असतो. रशियासारख्या राष्ट्रातदेखील प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या खाजगी कसणुकीसाठी अगदी छोटा असा जमिनीचा तुकडा दिला जातोच. याउलट खाजगी भांडवलशाही अर्थव्यवस्थेवर आधारित अशा अमेरिकेच्या

संयुक्त संस्थानांतही, आज जवळजवळ २५ टक्के उत्पादन सरकारी क्षेत्रात चालू आहे. परंतु अर्थव्यवस्थेचा मुख्य भर कशावर आहे, हे पाहून अशा अर्थव्यवस्थांचे एकेका प्रकाराचे वर्गीकरण सामान्यपणे करण्यात येत असते.

मिश्र अर्थव्यवस्था या दोन्ही टोकांपासून बरीच वाटचाल करून आलेली असते. ही मध्यम स्थिती ध्येय म्हणून की धोरण म्हणून स्वीकारलेली आहे, हे सांगणे अनेकदा कठीण असते. साम्यवादी राष्ट्रे क्रांतीनंतरच्या नजीकच्या काळात, परिवर्तनकालातील आपद्धर्म म्हणून, खाजगी क्षेत्राचा काही भाग काही काळ अस्तित्वात राहू देतात. परंतु केवळ धोरण म्हणून खाजगी भांडवलशाही अर्थव्यवस्थेशी काही काळ केलेली ही तडजोड असते. रशियातील साम्यवादी क्रांतीनंतरही पहिल्या आवेशात केलेले सर्व राष्ट्रीयीकरण व्यवहारात पेलण्यासारखे नाही, असे आढळून आल्यावर काही काळ काही प्रमाणात पुन्हा खाजगी क्षेत्राला वाव देण्यात आला. ‘नव्या आर्थिक धोरणाचा कालखंड’ म्हणून हा कालखंड साम्यवादी रशियाच्या इतिहासात ओळखला जातो. परंतु लेनिनच्याच शब्दांत सांगावयाचे तर ‘नंतर दोन पावले पुढे टाकता यावीत यासाठी काही काळ एक पाऊल मागे घेण्यात आले होते’. शेवटी आपल्याला संपूर्ण अर्थक्षेत्र सरकारीच करावयाचे आहे, याविषयी क्रांतीच्या नेत्यांच्या मनात शंका नव्हती. इतर साम्यवादी राष्ट्रांनाही क्रांतीनंतर अशाच परिस्थितीतून जावे लागले आहे.

परंतु केवळ धोरण म्हणूनच नव्हे, तर अंतिम ध्येय म्हणूनही मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला जाण्याची शक्यता असते. भारतीय नियोजनातील मिश्र अर्थव्यवस्थेविषयीची भूमिका या स्वरूपाची आहे. या भूमिकेत सरकारी व खाजगी क्षेत्रे परस्परांशी विरोध न करता गुण्यागोविंदाने

नांदतील, एवढीच केवळ अपेक्षा नाही. या दोन्ही क्षेत्रांचे कार्य परस्परसहकार्यांचे व एकमेकांना पूरक होईल, अशी अपेक्षा या भूमिकेमागे आहे.

समाजवादी समाजरचनेचा संकल्प सोडल्यानंतर अशी समन्वयवादी भूमिका घेण्याचे काय कारण आहे? की आजची भूमिका हाही केवळ एक धोरणाचाच भाग आहे ? याविषयीचा कोणताच निर्वाळा आजमितीला देणे कठीण आहे. परंतु दोन्ही क्षेत्रे निरंतर एकाच वेळी अस्तित्वात ठेवणे सयुक्तिक आहे. या भूमिकेच्या समर्थनार्थ कोणती कारणे दिली जातात, ते समजून घ्यावयास हवे.

सर्व क्षेत्रे सरकारच्या हाती देणारी साम्यवादी अर्थव्यवस्था व सर्व क्षेत्रे खाजगी भांडवलदारांच्या हाती ठेवू पाहणारी अनिर्बंध भांडवल शाही अर्थव्यवस्था, या दोन्ही अर्थव्यवस्थांमध्ये काही गुण वा काही दोषही आहेत. मिश्र अर्थव्यवस्था हा या दोन्हींतील दोष टाळून गुण स्वीकारण्याचा प्रयत्न आहे. साम्यवादी अर्थव्यवस्थेत सर्व अर्थव्यवहारांचे सरकारच्या हातात केंद्रीकरण झाल्यानंतर परिणामी राज्यसत्तेचेही केंद्रीकरण होते व व्यक्तिस्वातंत्र्याचा लोप होतो. त्याचा परिणाम आर्थिक विकासाची गती मंद होत जाणे असाही होतो. संपूर्ण

अर्थक्षेत्र शासनाच्या हातात येण्यातील हा सर्वांत मोठा धोका आहे. याउलट अनिर्बंध भांडवलशाहीत मक्तेदारी वाढते, मजुरांचे व ग्राहकांचे शोषण होते, मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता निर्माण होते, व संसदीय लोकशाही अस्तित्वात असूनही संपत्तीच्या जोरावर राजकीय सत्ता खाजगी भांडवलदारांना आपल्या मनाप्रमाणे राबविता येते. मिश्र अर्थव्यवस्थेमुळे या दोन्ही टोकांच्या अडचणींतून आपल्याला मार्ग काढता येईल, अशी अपेक्षा

असते.

‘अशी अपेक्षा असते’ असे म्हणावयाचे कारण असे, की मिश्र अर्थव्यवस्थेचा या दृष्टिकोनातून व एवढ्या प्रमाणावर यापूर्वी अन्य कोणत्याही राष्ट्रात प्रयोग झालेला नाही. भारतातील परिस्थिती विशेष स्वरूपाची आहे. भारताची लोकसंख्या आधीच भरमसाट आहे. अलीकडे दर दहा वर्षांनी तिच्यात सु. पंचवीस टक्क्यांनी वाढ होत आहे. या लोकसंख्येच्या मानाने राष्ट्रीय उत्पन्न कमी आहे व त्याचीही विषम विभागणी झालेली आहे. यांमुळे बहुसंख्य जनता आज दारिद्र्यात खितपत पडलेली आहे. भारताचा आर्थिक विकास द्रुतगतीने घडवून आणणे ही आज अत्यंत निकडीची गोष्ट झालेली आहे. हा विकास लोकशाही मार्गानेच घडवून आणावयाचा, असा भारताचा आग्रह आहे. जलद आर्थिक विकास, संपत्तीचे उत्तरोत्तर अधिकाधिक समविभाजन व लोकशाहीचे वर्धापन या गोष्टी एका वेळी साध्य करावयाच्या असतील, तर शासनाच्या हातात सर्व सत्ता केंद्रित होणार नाही, परंतु सर्व अर्थव्यवहारांवर शासनाचे योग्य नियंत्रण राहील, अशा स्वरूपाची रचना करणे अत्यावश्यक आहे.

मिश्र अर्थव्यवस्था योग्य रीतीने राबविली गेल्यास ती हेच साध्य करण्याचा प्रयत्न करीत असते. ती अशा रीतीने राबविली जाऊ शकते की नाही, हेदेखील भारतातील अनुभवावरूनच शेवटी मुख्यत्वेकरून ठरवावयाचे आहे.

एखादे आर्थिक दृष्ट्या अप्रगत राष्ट्र जलद आर्थिक विकासाचा प्रयत्न करीत असताना आर्थिक नियोजन अपरिहार्य असते. उपलब्ध अपुर्‍या साधनसामग्रीच्या आधारावर सर्व समाजाच्या हिताच्या दृष्टीने कोणते

अधिकाधिक फलदायी कार्यक्रम हातात घेता येतील व अपुऱ्या साधनसंपत्तीचा गैरवापर किंवा अपव्यय कसा टाळता येईल, यांविषयी नियोजन-आयोगाला दक्षता घ्यावी लागते. ही दक्षता अनिर्बंध खाजगी भांडवलशाही घेऊ शकत नाही. कारण खाजगी भांडवलदारांची मुख्य प्रेरणा स्वाभाविकपणेच आपल्यासाठी अधिकाधिक नफा मिळवण्याची असते. जे उत्पादन एकूण सामाजिक हिताच्या दृष्टीने अधिक आवश्यक असेल, तिकडे खाजगी भांडवलदार वळेलच असे नाही. त्याचे लक्ष बाजारभाव, उत्पादनखर्च व नफ्याचे प्रमाण यांवर केंद्रित झालेले असते. यासाठीच सामाजिक हिताच्या दृष्टीने उत्पादन-कार्याचा क्रम ठरविताना ती गोष्ट खाजगी भांडवलदारांच्या अनिर्बंध कृतीवर अवलंबून ठेवण्याऐवजी, ते निर्णय एकूण समाजहिताचा विचार जेथे होऊ शकेल, अशा एखाद्या नियोजन-आयोगाकडे सोपवावे लागतात. आज पश्चिमात्य प्रगत भांडवलशाही राष्ट्रांतही अशा प्रकारचे निर्णय केवळ बाजारभावांच्या गमकांवर व खाजगी क्षेत्राच्या होणाऱ्या प्रतिक्रियेवर विसंबून ठेवले जात नाहीत. आर्थिक कार्यक्रमाची व धोरणाची मुख्य दिशा सरकार ठरवीत असते; त्यांच्या चौकटीत खाजगी भांडवलदारांना आपले कार्यक्रम आखावे लागतात. अप्रगत दरिद्री राष्ट्रांतील आर्थिक प्रश्न तर प्रगत राष्ट्रांतील प्रश्नांहून अधिक बिकट असतात व शासनाला अशी आर्थिक कार्यक्रमाची चौकट आखून द्यावीच लागते. या चौकटीच्या आत काही स्वतंत्र हालचाल करावयास खाजगी भांडवलदारांना मुळीच वाव नसतो, असे मात्र मानावयाचे कारण नाही

या कार्यक्रमाच्या मर्यादा पाळल्या जाण्यासाठी शासनाला काही दक्षता घ्यावी लागते. त्याचप्रमाणे घातलेल्या मर्यादेत कार्यक्रम उत्साहाने पार पडावा, यासाठी काही पूरक गोष्टीही उपलब्ध करून द्याव्या लागतात. सर्व अर्थव्यवस्थेवर नीट नियंत्रण ठेवता येईल, अशा मोक्याच्या जागा शासनाला

हस्तगत कराव्या लागतात; सरकारी क्षेत्रात आणाव्या लागतात. मध्यवर्ती बँक ही अशी एक मोक्याची जागा होय. या बँकेच्या धोरणाचा प्रभाव संपूर्ण अर्थव्यवस्थेवर पडत असतो. साम्यवाद किंवा समाजवाद न स्वीकारणाऱ् या अनेक राष्ट्रांतूनही यामुळे मध्यवर्ती बँकेचे राष्ट्रीयीकरण केल्याचे आढळून येते. राष्ट्रातील बँकिंग व्यवसाय ही अशीच एक महत्त्वाची मोक्याची जागा आहे. एकूण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने बाह्य सामाजिक नियंत्रणांच्या द्वारे खाजगी बँकांच्या व्यवहारास योग्य असे वळण लावता येत नसल्यास, या व्यवसायाचे राष्ट्रीयीकरणही क्रमप्राप्त होते. वाहतूक व दळणवळणाची साधने, लोखंड, कोळसा, वीज, तेल इ. महत्त्वाच्या सर्व गोष्टींचे उत्पादनही सरकारी क्षेत्रात आणणे अनेकदा आवश्यक ठरते. अनेकदा भांडवलशाही राष्ट्रांतही यांपैकी काहींचे राष्ट्रीयीकरण केल्याचे आढळते. मिश्र अर्थव्यवस्था अशांसंबंधीचे निर्णय अमुक गोष्टींचे राष्ट्रीयीकरण करावयाचेच किंवा करावयाचेच नाही, अशा तात्त्विक आग्रहाच्या भूमिकेवरून न घेता व्यावहारिक उपयुक्ततेच्या कसोट्या लावून घेत असते.

## ३). समाजवादी अर्थव्यवस्था:

वर्गाच्या संघर्षाची ही कल्पना समाजवादाच्या हृदयात आहे. कर्ल मार्क्सचा सर्वात प्रमुख आवाज असा विश्वास आहे की या अन्यायांना सामोरे जाणारे अत्यल्प उत्पन्न असलेले कामगार श्रीमंत बुर्जुआवर्गाविरूद्ध बंडखोरी करतील. त्या जागी त्यांनी अशा समाजाची कल्पना केली जेथे सरकार - किंवा कामगार स्वत: मालकीचे आणि नियंत्रित उद्योग असतील.भांडवलशाहीच्या विपरित, समाजवाद्यांचा विश्वास आहे की संसाधनांची सामायिक मालकी आणि केंद्रीय नियोजन वस्तू आणि सेवांचे अधिक समान वितरण करते. थोडक्यात, त्यांचे असे मत आहे की ज्या

कामगारांनी आर्थिक उत्पादनात योगदान दिले त्यांना बक्षीस मिळावे. ही भावना समाजवादी घोषणेमध्ये स्फटिकरुप आहे: “प्रत्येकाकडून त्यांच्या क्षमतेनुसार, प्रत्येकाला त्यांच्या गरजेनुसार.”

खाली समाजवादाची काही मुख्य तत्त्वे आहेतः

उत्पादन साधनांची सार्वजनिक किंवा सामूहिक मालकी

अर्थव्यवस्थेचे केंद्रीय नियोजन

समानता आणि आर्थिक सुरक्षेवर जोर दिला

वर्ग भेद कमी करण्याचे ध्येय

स्वतः मार्क्सचा असा विचार होता की विद्यमान भांडवलशाही आदेश मागे टाकण्यासाठी कामगार वर्ग किंवा सर्वहारावर्गाच्या नेतृत्वात क्रांती आवश्यक आहे. तथापि, बरीच आर्थिक समानता मिळविण्यासाठी भांडवलशाहीऐवजी बदलण्याऐवजी फ्रान्स, जर्मनी आणि स्कॅन्डिनेव्हिया-अ ॅडव्होकेट सुधार करणारे अनेक समाजवादी नेते-ज्यात प्रभावशाली “सोशल डेमोक्रॅट” आहेत.

“समाजवाद” या संज्ञेबद्दल संभ्रमाचा आणखी एक स्रोत असा आहे की तो बर् याचदा “साम्यवाद” सह परस्पर बदलला जातो. खरं तर, दोन शब्दांचे अर्थ भिन्न आहेत. मार्क्सच्या बाजूने काम करणा F्या फ्रेडरिक एंगेल्सच्या म्हणण्यानुसार, समाजवाद हा क्रांतीचा पहिला टप्पा आहे, ज्यामध्ये सरकार आर्थिक जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते आणि वर्गातील फरक कमी होऊ लागतात. हा अंतरिम टप्पा शेवटी साम्यवादाला मार्ग दाखवतो, हा

वर्गविहीन समाज जिथे कामगार वर्ग आता राज्यावर अवलंबून नाही. व्यावहारिकदृष्ट्या, साम्यवाद असे नाव आहे जे वारंवार समाजवादाच्या क्रांतिकारक स्वरूपाला दिले जाते, याला मार्क्सवाद-लेनिनवाद असेही म्हटले जाते, ज्याने २० च्या काळात सोव्हिएत युनियन आणि चीनमध्ये मुळाशी धरले.

# संदर्भ

1). T. Y. B. Com भारतीय आणि जागतिक विकास.

2). Www.indianeconomy.in.co

3).भारतीय अर्थव्यवस्था (रमेश सिंह )

4). Google Wikipedia

5). Www.google.com